**सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इ. योजनांतर्गंत अनुज्ञेय लाभ अदा करण्याबाबत <u>अवलंबवयाची सुधारीत कार्यपध्दती</u>.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : इबीसी-२०१७/प्र.क्र.५२४/शिक्षण-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ जानेवारी,२०१८

<u>वाचा</u> :

(१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.ईबीसी-२०१७/प्र.क्र.४०३/ शिक्षण-१, दिनांक ०७ ऑगस्ट,२०१७

(२) शासन निर्णय, समक्रमांक-इबीसी-२०१७/प्रक्र.५२४/शिक्षण-१, दि.८ डिसेंबर,२०१७

<u>प्रस्तावना</u> :-

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने विकसित केलेल्या महाडिबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यानी अर्जाची नोंद केल्यानंतर त्यांना अदा करावयाचे लाभ प्रदान करण्याबाबतची ऑनलाईन प्रक्रिया महाडिबीटी एजन्सी मार्फत राबविण्यात आलेली आहे. ही प्रक्रिया प्रगतीत असल्याने, पात्र विद्यार्थ्यास महाविद्यालयात फी भरण्यास अडचणी निर्माण होवू नयेत म्हणून, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात पहिल्या सहामाहीसाठी शिक्षण शुल्क परिक्षा शुल्काच्या ५० % च्या ६० % इतकी रक्कम विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर बंधपत्र घेवून जमा करण्याचा, यासाठी बँकेच्या सल्ल्याने प्रणाली विकसित करण्याचा, तसेच सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी ऑफलाईन पध्दतीने योजनांची देयके अदा करण्यासाठी महाडिबीटी प्रणालीतून काही योजना वगळण्याचा, त्याचबरोबर महाडिबीटी प्रणालीवरील सर्व त्रुटींचे निराकरण करुन सदर प्रणाली अंतिम टप्प्यापर्यंत कार्यन्वित करण्याची कार्यवाही माहिती व तंत्रज्ञान विभागाने एक महिन्यात पूर्ण करण्याचा निर्णय संदर्भीय दिनांक ८डिसेंबर,२०१७ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.

तथापि, माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून महाडीबीटी प्रणालीवर शिष्यवृत्तीच्या योजनांचे लाभ अदा करण्याच्या दृष्टीने, सदर प्रणाली अंतिम टप्प्यापर्यंत कार्यन्वित करण्याची कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नसल्याची बाब निदर्शनास आली. त्यामुळे, या संदर्भात तातडीने उपाययोजना करण्याच्या दृष्टीने, मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १७.१.२०१८ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना (केंद्र पुरस्कृत १००% : शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, निर्वाहभत्ता इ.) व राज्य शासनाची शिक्षण फी परिक्षा फी प्रतिपूर्ती योजना (राज्य पुरस्कृत १००%) या योजनांतर्गत विद्यार्थ्यांना मंजूर करावयाच्या शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परिक्षा फी प्रतिपूर्तीबाबत कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :

माहिती व तंत्रज्ञान संचालनालयामार्फत विकसित करण्यात येत असलेली महाडीबीटी ही संगणकीय प्रणाली पूर्णपणे कार्यान्वित झालेली नसल्याने व त्यावर पात्र विद्यार्थ्यांना अनुज्ञेय लाभ अदा करणे शक्य होत नसल्याने, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क,निर्वाहभत्ता इ.) योजना व राज्य शासनाची शिक्षण फी, परिक्षा फी प्रतिपूर्ती योजना या योजनांतर्गत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या अर्जांवर कार्यवाही करणेसाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे :-

(अ) **नुतनीकरण अर्ज** : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या महाईस्कॉल या जुन्या प्रणाली वरील सन २०१६-१७ या वर्षातील महाविद्यालयांमध्ये प्रवेशित व नोंदणीकृत असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे अर्ज, सन २०१७-१८ या वर्षामध्ये संबंधित महाविद्यालयांमार्फत पूर्वीप्रमाणेच महाईस्कॉल प्रणाली वरील कार्यपध्दतीनुसार नुतनीकरण करुन संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी पात्र विद्यार्थ्यांची अनुज्ञेय भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, निर्वाहभत्ता इ.) योजनेची / राज्य शासनाची शिक्षण फी, परिक्षा फी प्रतिपूर्ती योजनेची रक्कम त्यांच्या आधारसंलग्न बॅन्क खात्यावर मंजूर करावी.

(ब) **नवीन अर्ज :** सन २०१७-१८ करीता महाविद्यालयांत ज्या नवीन (Fresh) प्रवेशित विद्यार्थ्यांनी महाडिबीटी प्रणालीवर अर्जांची नोंदणी केलेली आहे असे विद्यार्थी व जे विद्यार्थी तांत्रिक अडचणींमुळे महाडिबीटी प्रणालीवर नोंदणी करु शकले नाहीत, अशा सर्व विद्यार्थ्यांकरीता महाईस्कॉल प्रणालीवर अपलोड करण्यात आलेल्या अर्जाच्या नमुन्यात महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने स्विकारुन ते संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांना सादर केल्यानंतर सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी विहीत कार्यपध्दतीनुसार पात्र विद्यार्थ्यांची अनुज्ञेय भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, निर्वाहभत्ता इ.) योजनेची / राज्य शासनाची शिक्षण फी परिक्षा फी प्रतिपूर्ती योजनेची रक्कम त्यांच्या आधारसंलग्न बॅन्क खात्यावर मंजूर करावी.

(१) या करीता, ज्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर केलेले आहेत, तसेच ज्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यानी महाडिबीटी पोर्टलवर अद्यापही ऑनलाईन अर्ज केलेले नाहीत, अशा सन २०१७-१८ मध्ये नव्याने प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी (Fresh Student) महाईस्कॉल पोर्टलवरुन अर्जाचा नमुना (प्रपत्र-क संलग्न) डाऊनलोड करुन, पुर्ण अर्ज भरुन, आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या प्रतीसह महाविद्यालयास ऑफलाईन (मॅन्युअली) पध्दतीने तात्काळ जमा करावेत.

(२) सन २०१७-१८ पासून पात्र विद्यार्थ्यांची अनुज्ञेय शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परिक्षा फी ची अदायगी विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर होणार असल्यामुळे विद्यार्थी व महाविद्यालयांकडून विहीत अटी व शर्ती नमूद केलेल्या सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील बंधपत्रासह (Indemnity Bond) प्रस्ताव संबंधित महाविद्यालयांमार्फत संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे सादर करावेत.

(३) संबंधित महाविद्यालयाने प्रस्तावासोबत नवीन प्रवेशित आणि नुतनीकरणाच्या पात्र अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची स्वतंत्र माहिती या शासन निर्णयासोबतच्या **"प्रपत्र-ब"** (B Statement) मध्ये प्रमाणित करुन, Hard Copy व Soft Copy संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे तात्काळ सादर करावी.

(४) संबंधित महाविद्यालयाने **"प्रपत्र-ब"** (B Statement) मध्ये शुल्क भरताना ते अद्ययावत (सन २०१७-१८ चे अथवा किमान सन २०१६-१७ च्या) फी-स्ट्रक्चर प्रमाणे भरावे. सदर **"प्रपत्र-ब"** मध्ये संबंधित महाविद्यालयांनी नमूद केलेले शुल्क हे संबंधित विद्यापीठे / फी रेग्युलेटरी ॲथॉरिटी (FRA) यांनी त्या-त्या वर्षी मान्य/मंजूर केलेले असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सदर विवरणपत्रात नमूद केलेले शुल्क हे संबंधित महाविद्यालयांनी संबंधित जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडून देखील मान्य करुन घेणे आवश्यक राहील.

(५) संबंधित महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचा अर्ज व **"प्रपत्र-ब"** (B Statement) सोबत प्रत्येक विद्यार्थ्याच्या पुढील कागदपत्रांच्या प्राचार्यानी स्वाक्षांकीत (attested ) केलेल्या प्रती सादर कराव्यात.

- (i) विद्यार्थ्याच्या जातीचे प्रमाणपत्र (फक्त नवीन [Fresh]प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता),
- (ii) आवश्यक असेल तेथे जात वैधता प्रमाणपत्र (फक्त नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता)
- (iii) मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा पुरावा / गुणपत्रिका,
- (iv) विद्यार्थ्याची ७५% पेक्षा जास्त उपस्थिती असल्याबाबतचे प्रमाणपत्र,
- (v) उत्पन्नाचा दाखला (भा.स.मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी फक्त नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता)
- (vi) आधारकार्डची प्रत,
- (vii) बॅकेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत,
- (viii) बँकेकडून आधार संलंग्न झाल्याचे स्लिप/पोहच पावती,
- (ix) विहीत नमुन्यातील बंधपत्र (indemnity bond),
- (x) आवश्यकता असेल तेथे रहिवास प्रमाणपत्र (फक्त नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी)
- (xi) आवश्यकता असेल तेथे गॅप प्रमाणपत्र.

(६) संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची पात्रता, कुटुंबाचे उत्पन्न, मागील वर्षी विद्यार्थी उत्तीर्ण असल्याबाबत, तसेच विद्यार्थ्याची उपस्थिती ७५ टक्के असल्याची, त्याचबरोबर महाविद्यालयाची मान्यता, अभ्यासक्रमाची मान्यता, प्रवेश क्षमता या सर्व बाबींची मूळ प्रमाणपत्र, कागदपत्रांवरुन खात्री करण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची असेल. तसेच अभ्यासक्रमासाठी देय

असलेले शुल्क हे नियमानुसार व प्रचलित शासन निर्णयानुसार आहे, याबाबत संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

(७) त्याचप्रमाणे संबंधित विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक, तसेच सदर आधार क्रमांक हा विद्यार्थ्याच्या बँक खात्याशी संलग्न असल्याची खात्री करुन, असे पात्र अर्ज, वर नमूद केलेल्या आवश्यक कागदपत्र व प्रपत्रांसह, संबंधित प्राचार्यांनी संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे मॅन्युअली सादर करावेत.

(८) संबंधित महाविद्यालयाने संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांना दिलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास, संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य हे नियमा नुसार कारवाईस पात्र राहतील.

(९) वरील प्रमाणे महाविद्यालयांकडून नवीन अर्ज तसेच नुतनीकरणाचे अर्ज /प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी विद्यार्थ्याचे जातीचे प्रमाणपत्र, आवश्यक तेथे जातीचे वैधता प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, आवश्यक तेथे अधिवास प्रमाणपत्र, मागील वर्षाचे उत्तीर्ण प्रमाणपत्र, ७५% उपस्थिती व आधार क्रमांक इत्यादीं बाबींची खात्री करुन, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाची विद्यार्थ्यास अनुज्ञेय असलेल्या शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, निर्वाहभत्ता इ.)/ शिक्षण फी, परिक्षा फी ची **संपूर्ण १०० टक्के** रक्कम विद्यार्थ्यांस मंजूर करावी.

(१०) संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी विद्यार्थ्यांचे अर्ज/ प्रस्तावास मंजूरी दिल्यानंतर प्रचलित पध्दतीने देयके तयार करुन ती मॅन्युअली कोषागारात सादर करावीत आणि देयके मंजूर होवून धनादेश प्राप्त झाल्यानंतर ईसीएसव्दारे पात्र विद्यार्थ्याची अनुज्ञेय शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क,निर्वाहभत्ता इ.)/ शिक्षण फी, परिक्षा फी ची रक्कम तात्काळ संबंधित विदयार्थ्याच्या आधार संलग्न बॅन्क खात्यावर जमा करावी.

(११) विद्यार्थ्यांने दिलेल्या बंधपत्रानुसार, विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झालेली महाविद्यालयाच्या फी ची रक्कम, संबंधित विद्यार्थ्यांने कार्यालयीन सात दिवसांच्या आत महाविद्यालयास जमा करावी. शासनातर्फे विद्यार्थ्यांना मिळालेल्या शिक्षण फी, परिक्षा फी ची रक्कम, जी विद्यार्थ्याने महाविद्यालयास भरणे आवश्यक आहे, ती संबंधित विद्यार्थ्यांकडून जमा करुन घेण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची असेल.

(१२) वरील परिच्छेद-(अ) व (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना व राज्य शासनाची शिक्षण फी, परीक्षा फी प्रतिपूर्ती योजनेच्या नुतनीकरणाचे अर्ज हे सामाजिक न्याय विभागाच्या पूर्वीच्या महाईस्कॉल प्रणाली वरुन आणि नवीन (Fresh) विद्यार्थ्यांचे अर्ज व महाडीबीटीवरुन वगळण्यात आलेल्या इतर सर्व योजनांचे अर्ज मॅन्युअली / ऑफलाईन पध्दतीने प्रक्रिया करुन, तरतुदीच्या उपलब्धतेच्या अधिन राहून सर्व संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी निकाली काढावेत.

(१३) सर्व संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी वरील प्रमाणे पात्र असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची अनुज्ञेय असलेली भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, निर्वाहभत्ता इ.) योजनेची / राज्य शासनाची शिक्षण फी, परिक्षा फी प्रतिपूर्ती योजनेची रक्कम ही, **अनुज्ञेय असलेल्या अभ्यासक्रमांसाठीच** अदा करावी.

२. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता संदर्भाधीन दिनांक ८.१२.२०१७ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मधील योजनांसह सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या खालील योजना सुध्दा महाडीबीटी पोर्टलवरुन वगळण्यात येवून, सर्व शिष्यवृत्तीच्या योजना ऑफलाईन मॅन्युअली पध्दतीने राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(१) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना (केंद्र पुरस्कृत १००%)

(२) राज्य शासनाची मॅट्रीकोत्तर शिक्षण फी परिक्षा फी प्रतिपूर्ती योजना (राज्यपुरस्कृत १००%)

(३) अनुसूचित जातीच्या इ.९वी व इ. १० वी च्या मुलामुलींसाठी भारत सरकार मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती (केंद्र पुरस्कृत १००%)

(४) अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांसाठी मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती (केंद्र पुरस्कृत)

३. सन २०१७-१८ मध्ये महाडिबीटी प्रणाली संपूर्णपणे कार्यान्वीत झालेली नसल्यामुळे पी.एफ.एम.एस. गेटवेमार्फत शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची अट शिथील करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. तसेच संदर्भीय दिनांक ७ ऑगस्ट,२०१७ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद ७ मधील आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना “आहंरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आलेली बाब वगळण्यात येत असून, यापूर्वी त्या-त्या योजनांकरीता विहीत केलेले आहंरण व संवितरण अधिकारी सन २०१७-१८ करीता कायम राहतील.

५. वरील प्रमाणे विहीत करण्यात आलेली कार्यपध्दती ही फक्त सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठीच लागू राहील.

६. सदरहू शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०१२९१७५६२७७२२२ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2018.01.29 18:12:54 +05'30'

**(दि.रा.डिंगळे)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (सा.न्या.व वि.स.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) मा.विधान परिषद/विधानसभा सदस्य, विधानभवन, मुंबई
६) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७) अमुस, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
११) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१६) आयुक्त,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे.
१७) संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२०) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे
२१) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
२२) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक/उच्च माध्यमिक)
२३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेय/लेखा परिक्षा) महाराष्ट्र ½,मुंबई/नागपूर.
२४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२६) सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण.
२७) निवडनस्ती (का.शिक्षण-१)

# “परिशिष्ट-अ”

(शासन निर्णय क्र. इबीसी २०१७/प्र.क्र.५२४ /शिक्षण -१, दिनांक २९ जानेवारी,२०१८ चे सहपत्र)

## सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इ. ची अनुज्ञेय रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँन्क खात्यावर मिळण्यासाठी विद्यार्थी व पालकाने द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond)

### (अ) महाविद्यालयाने द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond)

(I) श्री. ---------------------------------------------------------- या अर्जदाराने सोबतच्या बंधपत्रात (Indemnity Bond) नमूद केलेली सर्व माहिती, त्याच्या कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न, तो सध्या शिकत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती, शैक्षणिक माहिती, त्याचे वसतिगृह, वसतिगृहा बाहेर राहण्याची माहिती शुल्करचना, जातीचे प्रमाणपत्र इ. तपशिल त्याच्या मुळ कागदपत्रांवरुन पूर्णपणे तपासण्यात आला असून, अर्जात नमूद केलेला तपशिल बरोबर आहे. त्यानुसार, मी, श्री / श्रीमती ------------------------------------------------------------ ( प्राचार्याचे नाव ) ----------------------------------------------------------------------या शैक्षणिक संस्थेच्या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत असुन, त्या अधिकारात **उपरोक्त** विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क इतर शुल्क मंजूर करण्याकरीता शिफारस करीत आहे.

(II) मी निम्नस्वाक्षरीत हमी देतो की, अर्जदाराची शिक्षण शुल्क व इतर शुल्काची रक्कम जी महाविद्यालयाकडे सुपूर्द केलेली आहे, ती ज्या प्रयोजनासाठी दिलेली आहे, त्या विशिष्ट प्रयोजनासाठी त्याचा विनियोग करीन आणि त्याबाबीचे हिशोब ज्या प्राधिकाऱ्याने ही तरतूद सुपूर्द केलेली आहे, त्या प्राधिकाऱ्याकडे नियमितपणे पाठवेन. विद्यार्थी महाविद्यालय सोडून गेल्यास किंवा त्याने विनापरवानगी अभ्यासक्रमात बदल केल्यास किंवा अन्य कोणत्याही अनियमिततेमुळे त्याचा प्रवेश रद्द झाल्यास, त्यास मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्ती / शिक्षण फी, परिक्षा फी व इतर शुल्काची रक्कम सरकारी लेख्यात जमा झाल्याशिवाय त्याचा शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला जारी करणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य या नात्याने माझ्याकडे राहील.

(III) विद्यार्थ्याच्या अर्जामध्ये नमूद केलेली माहिती, अर्जदाराने दिलेल्या मुळ कागदपत्राचे आधारे मी तपासलेली आहे. तसेच अर्जदारानी सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती तपासलेल्या असून सादर केलेल्या कागदपत्रामध्ये कोणताही बदल, खाडाखोड, दुरुस्ती वा फेरफार आढळून आलेला नाही.

(IV) मी निम्नस्वाक्षरीत प्रमाणित करतो की, अर्जदार हा आमचे महाविद्यालयामधील नियमित विद्यार्थी आहे. त्याने कोणत्याही अन्य महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेला नाही, तसेच त्याची सरासरी उपस्थिती ७५% पेक्षा अधिक आहे. तसेच सदर विद्यार्थ्याकडून महाविद्यालयाने कोणतेही शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर अनुज्ञेय शुल्क घेतलेले नाही.

(V) आमचे महाविद्यालय हे मान्यता प्राप्त आहे, ते अनुदानित / विनाअनुदानित आहे, मान्य झालेले अभ्यासक्रम हे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी मान्यता दिलेले आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ही सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या मान्यतेनुसारच असुन, त्या प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून मागासवर्गीय विद्यार्थ्याचे अर्ज संबंधित सक्षम कार्यालयास फॉरवर्ड केले आहेत. त्यांची शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क व इतर शुल्क सुध्दा, संबंधित सक्षम प्राधिकारी / विद्यापीठ यांनी मान्य केल्याप्रमाणेच असून ती अवास्तव किंवा अवाजवी नाहीत. शासन / विद्यापीठ / सक्षम प्राधिकारी यांचे प्रचलित नियम व अटी यांचे पालन करुन व त्यामधील नियम, अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यार्थ्याचा अर्ज योग्य व नियमानुसार असून, त्याची शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्काची देय रक्कम, संबधितांचे आधार संलग्न बॅक खात्यावर जमा होणेसाठी शिफारस करण्यात येत आहे. त्यामध्ये अनियमितता उणीवा व गैरप्रकार झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही महाविद्यालयाची असेल.

जावक क्रमांक --------------
दिनांक ---------------
ठिकाण ------------------

प्राचार्याची स्वाक्षरी--------------------------------------
संपूर्ण नाव --------------------------------------
महाविद्यालयाचा शिक्का

**टिप :- प्रस्तावासोबत विद्यार्थी/पालकांनी व महाविद्यालयांनी द्यावयाचे बंधपत्र प्राचार्यांनी एकत्रितच संलग्न करुन द्यावयाचे आहे.**

## (ब) विद्यार्थी व पालकांनी द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond):-

१) मी / आम्ही खाली सही करणार / करणारे प्रतिज्ञापन करतो की, शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत. अर्जात वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती पूर्णपणे सत्य आहे. सदरची माहिती खोटी अथवा अपुरी आढळल्यास भारतीय दंडविधाना प्रमाणे होणाऱ्या दंडास / शिक्षेस मी / आम्ही पात्र आहे / आहोत. अर्जात नमूद केलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती वा निवेदन चुकीचे आढळून आल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल व तो माझ्यावर / आम्हावर बंधनकारक असेल, अशी मी / आम्ही हमी देतो. जर शिष्यवृत्तीची, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अनुज्ञेय रक्कमेपेक्षा अधिक मिळाली तर मी / आम्ही ती शासनास जमा करु, अशी जास्तीची अथवा अन्य कारणामुळे वसूल करण्यात येणारी रक्कम मी / आम्ही पूर्णपणे शासनास परत करण्याची हमी देतो.

२) माझ्या कुटुंबाच्या उत्पन्नाची व जातीची अर्जात नमूद केलेली माहिती खोटी आढळल्यास माझ्या / माझ्या पाल्याच्या विरुध्द होणाऱ्या कारवाईस मी / आम्ही स्वत: जबाबदार राहू.

३) मी अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे, मी सक्षम अधिकाऱ्याकडून / प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केलेली असून, ती कागदपत्रे खरी असून योग्य मार्गाने मिळविलेली आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार / दुरुस्ती / बदल केलेला नाही. सदरील कागदपत्रे, प्रमाणपत्रे खोटी अथवा नकली नाहीत हे मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो. अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे, प्रमाणपत्रे खोटे अथवा बनावट आढळल्यास त्यास मी / आम्ही पुर्णत: जबाबदार असून त्यासाठी भारतीय दंड विधान कायदा कलम १९९ व २०० नुसार लागू होणाऱ्या शिक्षेस मी/आम्ही पात्र राहू, याची मला/आम्हाला पुर्ण जाणीव आहे.

४) सन २०१७-१८ या वर्षाची शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची रक्कम माझ्या आधार संलग्न बॅन्क खात्यावर जमा होताच, त्यापैकी महाविद्यालयास देय असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम सात दिवसात महाविद्यालयात जमा करुन त्याची रितसर पावती प्राप्त करुन घेण्याची माझी / आमची जबाबदारी असेल. शुल्क महाविद्यालयास जमा न केल्याने भविष्यात उदभवणा-या परिणामास मी / आम्ही वैयक्तीक जबाबदार असु असे प्रतिज्ञापुर्वक हमीपत्र / बंधपत्र मी / आम्ही सादर करीत आहोत.

ठिकाण :

दिनांक :

( अर्जदाराच्या वडीलांची / पालकाची सही व पुर्ण नाव ) ( अर्जदाराची सही व पूर्ण नाव )

# B - STATEMENT (FOR YEAR 2017-18)

| NAME of the COLLEGE / INSTITUTION | Name of Parent Institution/ Body/ Sanstha | Mahaeschol User ID | Address and Contact details of College | Bank Name | Bank Branch Name | Bank Account No. | Cuurent Month | Current Year | Financial Year | Name of Principal | Name of College Clerk |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

| Details of Students | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | Details of Scholarship sanctioned | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No | Name of the Candidate/ Student in full | | | GRN No. | Mahaeschol Application ID (if applicable) | MahaDBT Application ID (if applicable) | Email | Mobile No. | Caste | Sub-caste | Gender (Male/Female) | Fresh / Renewal | Current Class in which Studying | Current Course Name | University Name | Name of last Examination passed | Year of last examnation passed | Percentage of marks obtained during last Exam. only | Admission Date | Exam Date | Whether Hosteller or Day Scholar | Date of joining the College (if applicable) | Date of joining the Hostel (if applicable) | Amount of annual income of parents or guardi... | Aadhar No. | Aadhar Seeded Bank Account Number | Bank Branch Name | Bank IFSC Code | Period of Maintenance Allowance covered in Months | Amount of Maintenance Allowance in Rs. | Amount Paid by Student in Rs. | Amount of Tution Fees in Rs. | Amount of Examination Fees in Rs. | Amount of Other Fees in Rs. | Total Amount Sanctioned in Rs. |
| | Surname | First | Middle | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावामध्ये  समाविष्ठ असलेले विद्यार्थी हे सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयामध्ये नियमित विद्यार्थी आहेत.  उपरोक्त माहितीमध्ये विसंगती आढळल्यास किंवा अदा केलेली रक्कम ही निकषानुसार नसल्यास, होणारी वसुलपात्र रक्कम व्याजासह परत करण्याची जबाबदारी माझी असेल याची मला जाणीव असून सादर केलेली माहिती ही अचूक आहे. याबाबत मी प्रमाणित करत आहे.

**प्राचार्यांची स्वाक्षरी-**
**प्राचार्यांचे नाव-**
**स्थळ-**
**दिनांक-       /     /2018**
**शिक्का-**

**"प्रपत्र क"**

# नोंदणी अर्जाचा नमुना

**(भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व राज्य शासनाची शिक्षण फी, परीक्षा फी प्रतिपूर्ती योजनेकरीता)**

**(शासन निर्णय क्र. इबीसी २०१७/प्र.क्र.५२४ /शिक्षण -१, दिनांक २९ जानेवारी,२०१८ चे सहपत्र)**

विद्यार्थ्याचा पासपोर्ट आकराचा फोटो

अर्ज क्रमांक ----------------------

**अर्जदाराची इयत्ता दहावीची माहिती**

मॅट्रिक बोर्ड ---------------------- --------------------------------

| उत्तीर्ण वर्ष | दहावीचा बैठक क्रमांक | दहावीतील गुण (टक्केवारी) |
|---|---|---|
| | | |

**अर्जदाराची माहिती**

अर्जदाराचे संपुर्ण नांव :-----------------------------------------------------------------

अर्जदाराच्या आईचे नांव :---------------------------------------------------------------

अर्जदाराची जन्मतारीख :-------------------- लिंग ( ✔ ) :- पुरुष / स्त्री

महाराष्ट्र राज्याचा निवासी आहे काय ( ✔ ) :- होय / नाही

वैवाहीक स्थिती ( ✔ ) :- विवाहित / अविवाहित

विवाहीत असल्यास पतीचे नाव :---------------------------------------------------------

जात :------------------------------------ उपजात :------------------------------------

प्रवर्ग ( ✔ ) :- अनुसूचित जाती /विजा/भज/विमाप्र/इमाव

अर्जदार अनाथ आहे काय ( ✔ ):-होय / नाही

अर्जदार अपंग आहे काय ( ✔ ):-होय / नाही असल्यास अपंगत्व प्रकार व प्रमाण :-------------

अर्जदाराच्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न :-------------------------------------------------

अर्जदार पगारदार आहे काय ( ✔ ) :- होय / नाही असल्यास अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न :-----------

आधार क्रमांक :- ----------------------------------------------------------------------

आधार क्रमांक बॅक खात्याशी संलग्न आहे काय ( ✔ ) :- होय / नाही असल्यास सोबत पुरावा जोडण्यात यावा

## अर्जदाराचा शैक्षणिक तपशिल

| शैक्षणिक वर्ष | संस्थेचे नांव | अभ्यास क्रम / कोर्स | कोर्स वर्ष | टक्केवारी | निकाल |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## शैक्षणिक संस्थेचा तपशिल

प्रवेश घेतलेल्या शाळा / महाविद्यालय / संस्थेचे नांव :------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------

कोर्सचे नांव :-------------------------------------------------------------------------

कोर्सचे वर्ष :----------------------------- CAP नंबर :-----------------------------------

EID क्रमांक :------------------------------------ शैक्षणिक वर्ष :--------------------------

विषय :------------------------------------------------------------------------ ------

महाविद्यालय प्रवेश क्रमांक :---------------------------- प्रवेशाची तारीख :---------------------

कॉलेज शुल्क अदा आहे काय :------------------------ असल्यास किती फी अदा :---------------

फि पावती क्रमांक :------------------------------------फि पावती तारीख :---------------------

महाविद्यालयाच्या मान्यतेचा प्रकार :-------------------------------------------------------

डिप्लोमा नंतर प्रवेश आहे काय ( ✔ ):-होय / नाही

## अर्जदाराचा संपर्क तपशिल

सध्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता :-------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------

कायमचा पत्ता :----------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------

पिन कोड :- -----------------------------

दुरध्वनी क्र. :--------------------------------- मोबाईल क्र. :---------------------------------

## अर्जदाराच्या पालकाचा तपशिल

वडिलाचे/ पालकाचे संपुर्ण नाव :---------------------------------------------------------

वडिलाचे/ पालकाचा संपुर्ण पत्ता :-------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------

वय :--------- अर्जदाराशी नाते :--------------------- वडिलाचे/ पालकाचे व्यवसाय :------------

अर्जदाराचे वडील हयात आहेत काय ( ✔ ) :- होय / नाही

अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न :------------------------------------------------------

विवाहीत असल्यास पतीचे / पत्नीचे उत्पन्न :--------------------------------------------------

## वसतिगृहाची माहिती

वसतिगृहामध्ये रहात आहात काय ( ✔ ) :- होय / नाही

वसतिगृह लागू आहे काय ( ✔ ) :- होय / नाही    रात्र शाळेत शिकत आहात काय ( ✔ ) :- होय / नाही

वसतिगृहाचा प्रकार ( ✔ ) : शासकीय / अनुदानित / महाविद्यालयाने / खाजगी

वसतीगृह प्रवेश दिनांक :------------------

मेस सेवा उपलब्ध आहे काय ( ✔ ) :- होय / नाही    प्रतिमहा भाडे :--------------------------

वसतिगृह गृहपाल / गृहप्रमुख / घरमालकाचे नांव व पत्ता :----------------------------------------
------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------

## अर्जदाराचे दस्तावेज माहिती

जात प्रमाणपत्र क्रमांक :---------------------- कोणत्या कार्यालयाकडून प्राप्त झाले :--------------

------------------------------------------------------------------------------------

जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक :----------------- कोणत्या कार्यालयाकडून प्राप्त झाले :-------------

------------------------------------------------------------------------------------

उत्पन्नाचा दाखला क्रमांक :-------------------- कोणत्या कार्यालयाकडून प्राप्त झाले :------------

------------------------------------------------------------------------------------

## अर्जदाराच्या बॅंके अकाउंटचा तपशिल

बॅंकेचे नांव :----------------------------------------------------------------------

शाखेचे नांव :----------------------------------------------------------------------

IFSC code :------------------------------------- MICR code:------------------------

खाते क्रमांक :-------------------------------------------------------------

## अर्जा सोबत जोडलेले दस्तावेज

१)

२)

३)

४)

५)

*सुचना :-*

- *वरील अर्जाची हार्ड कॉपी ( छापील प्रत ) सोबत जोडलेल्या हमीपत्रासह महाविद्यालयात ८ दिवसाच्या आत सादर करणे बंधनकारक आहे.*
- *अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, मागील वर्षीची गुणपत्रिका यांच्या सत्यप्रती, वडीत हयात नसल्यास त्यांच्या मृत्यूचा दाखला जोडावा, आई व वडिल दोघेही हयात नसल्यास पालकांच्या उत्पन्नाचा दाखला, शैक्षणिक वर्षात गॅप असल्यास तहसीलदारासमोर केलेले प्रतिज्ञापत्र, मुलीचे बाबतीत विवाहीत असल्यास पतीच्या उत्पन्नाचा दाखला, आधारकार्ड प्रत जोडावी, बॅकांच्या पासबुकची प्रत किंवा रद्द केलेला चेक, मागील शाळा / महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची प्रत हि कागदपत्रे जोडावीत.*
- *बॅक खाते क्रमांक आधार कार्ड क्रमांकशी संलग्न व मोबाईल क्रमांक लिहणे अत्यंत महत्वाचे व अनिवार्य आहे जेणेकरुन आपली शिष्यवृत्ती योग्य खात्यावर जमा होईल आणि आपणास वेळोवेळी आपल्या अर्जाची स्थिती एस.एम.एस व्दारे समजेल.*

---